# युनिव्हर्सल हुमन राइट कौन्सिल भारत मुंबई टीम व अक्षरा सामाजिक प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने एक हात मदतीचा... मास्क व पाणी वाटप...!



*आज दिनांक 26/04/2021 रोजी युनिव्हर्सल हुमन राइट कौन्सिल भारत मुंबई टीम व अक्षरा सामाजिक प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने मुंबई पोलीस कमिशनर* *श्री हेमंत नगराळे सर* यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत मुंबई मधील उन्हातान्हात उभे राहून नाकाबंदी साठी व लोकांना सुरक्षित ठेवण्यासाठी आपले कर्तव्य बजावत असलेल्या पोलीस बांधवांसाठी त्यांच्या कर्तव्यावर असलेल्या ठिकाणी जाऊन त्यांना मोफत पाणी व मास्क वाटप करण्यात आले.सादर कार्यक्रमास सुरुवात सकाळी 11.30 पासून दादर टी. टी सर्कल येथून करण्यात आली. *1)चित्रा टॉकीज येथे नाकाबंदी वर असलेल्या पोलीस अधिकारी व शिपाई यांना पाणी वाटप करण्यात आले,2)लालबाग गणेश गल्ली येथे पाणी वाटप करण्यात आले, 3)तेजुकाया मेंशन,4) हिरामणी मार्केट पोलीस बीट, 5)काळाचौकी पोलीस ठाणे, 6)नागपाडा वाहतूक पोलीस चौकी,भायखळा* या सर्व ठिकाणा वरील जवळ जवळ 150 ते 200 पोलीस अधिकारी व शिपाई यांना मोफत पाणी,मास्क वाटप करण्यात आले. पोलीस दलाकडून *वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री गोकुळ सिंग पाटील साहेब ( काळाचौकी पोलीस ठाणे)* यांनी युनिव्हर्सल ह्यूमन राईट कौन्सिल व अक्षरा सामाजिक संस्थेचे आभार मानले.

सदर कार्यक्रमास महाराष्ट्र कार्यध्यक्ष *श्री.जितेंद्र दगडू दादा सकपाळ,मुंबई महासचिव व अक्षरा संस्थेचे अध्यक्ष श्री.अमोल वंजारे, चिंचपोकळी ब्लॉक प्रेसिडेंट सौ.वसुधा वाळूंज, दादर ब्लॉक प्रेसिडेंट श्री सचिन जाईजोडे, संजीव परमार,अंजली भोसले* व इतर कार्यकर्ते उपस्थित होते.